# पुणे विद्यापीठ

## मराठी विभाग
## पुणे युनिव्हर्सिटी कॅम्पस् फिल्म सोसायटी
## पुणे विद्यापीठ, पुणे – ४११ ००७

*एफएफएसआय* ही भारतातील विद्यापीठे व महाविद्यालयांच्या आवारात चित्रपटविषयक अभ्यासपूरक पर्यावरण निर्माण करणारी शिखर संस्था आहे. या *एफएफएसआय* च्या मदतीने मराठी विभागाने पुणे विद्यापीठात *पुणे युनिर्व्हसिटी कॅम्पस फिल्म सोसायटी* ची स्थापना केली आहे. विद्यापीठ आवरातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांसाठी ही फिल्म सोसायटी खुली असून या सर्वांनाच तिचे सभासद होता येईल. चित्रपटविषयक खुले व अभ्यासपूर्ण सांस्कृतिक पर्यावरण तयार करणे महिन्यातून दोन वेळा राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवरील अभिजात सिनेमा दाखवणे, त्यावर तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करणे, सिनेमा या कलाकृतीसंबंधी सजग भान निर्माण करणे व या संदर्भातील विविध कार्यशाळा, चर्चासत्रे तसेच चित्रपट महोत्सवाचे आयोजन करणे, हा विद्यापीठ आवारातील प्रस्तुत फिल्म सोसायटीचा उद्देश राहणार आहे. पुणे विद्यापीठाचा आवार व पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांमध्ये चित्रपटविषयक अभ्यासपूर्ण पर्यावरण निर्माण करण्यास आम्ही उत्सुक आहोत. *एफएफएसआय* च्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करीत विद्यापीठ पातळीवरील शिक्षक, शिक्षकेतर कर्मवारी व विद्यार्थीवर्गात चित्रपटकलेच्या माध्यमातून बहुविद्याशाखीय अभ्यासाचे सशक्त दालन खुले करावे व पारंपरिक अभ्यासाबरोबरच या नव्या विद्याशाखेचा अंतर्भाव विद्यापीठस्तरीय अभ्यासक्रमात अग्रकमाने व्हावा, असा व्यापक हेतूही या संलग्नीकरणामागे आहे. पुणे विद्यापीठाच्यावतीने पुणे विद्यापीठ कॅम्पस फिल्म सोसायटीचे कामकाज मराठी विभाग पाहणार आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : डॉ. प्रभाकर देसाई, समन्वयक व सहायक प्राध्यापक, पुणे विद्यापीठ कॅम्पस फिल्म सोसायटी, मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे – ४११ ००७. दूरध्वनी : ०२०.२५६०१३४२, चलभाष क्रमांक : ९४२०१७९१५९, ई–मेल : desai.critic@gmail.com, prabhakardesai@unipune.ac.in. विहित नमुन्यातील सभासद नोंदणी अर्ज व नोंदणी शुल्काचे चलन ह्या वेबपत्त्यावर उपलब्ध आहे.

**डॉ. प्रभाकर देसाई, समन्वयक** **डॉ. विद्यागौरी टिळक, मराठी विभागप्रमुख**